पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त विविध कार्यालयांसाठी निर्माण केलेल्या ७६,८०२ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीटीई-३६१८/प्र.क्र. १५ /पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ जानेवारी, २०१८.

<u>वाचा:-</u>

१) शासन निर्णय,गृह विभाग क्र.अेपीओ-०३१४/प्र.क्र.५९/पोल-३, दि. ०१.०९.२०१४
२) शासन निर्णय,गृह विभाग क्र.अेपीओ-०८१४/प्र.क्र.०८/पोल-३, दि. ०१.०९.२०१४
३) शासन निर्णय,गृह विभाग क्र.अेपीओ-०३१४/प्र.क्र.०७/पोल-३, दि. ०१.०९.२०१४
४) शासन निर्णय,गृह विभाग क्र.अेपीओ-३१११/प्र.क्र.१०७ (अ)/भाग-१/पु.र्बा.२/पोल-३, दि.२०.११.२०१४
५) शासन निर्णय, गृह विभाग.क्र.अेपीओ-०३१४/प्र.क्र.४७/पोल-३, दि. १३.०८.२०१५
६) शासन निर्णय, गृह विभाग क्र.अेपीओ-०३१४/प्र.क्र.४७/पोल-३, दि. २२.०४.२०१५
७) शासन निर्णय, गृह विभाग क्र.अेपीओ-३५१४/प्र.क्र.१०/पोल-३, दि. २०.०५.२०१५
८) शासन शुद्धीपत्रक, गृह विभाग क्र.अेपीओ-०८१४/प्र.क्र.०८/पोल-३, दि. ३०.०५.२०१५
९) शासन निर्णय, गृह विभाग क्र.अेपीओ-३६१६/प्र.क्र.८८/पोल-३, दि.०९.०१.२०१७
१०) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
११) अपर पोलीस महासंचासलक (नि. व स.) यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/६१४३/७६ हजार पदे/पोल-३/६०/२०१६, दि.२२.१२.२०१७.
१२) वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०८.०१.२०१८.

<u>शासन निर्णय:-</u>

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त विविध कार्यालयांसाठी निर्माण केलेल्या ७६,८०२ अस्थायी पदांना गृह विभागाच्या उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १० येथे नमूद दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयांन्वये दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

अ.क्र.	पदनिर्मिती केलेल्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक	एकूण पदांची निर्मिती	मागील मुदतवाढ दिलेल्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक
१.	सन २००६ पूर्वी निर्माण करण्यात आलेली सर्व अस्थायी पदे	१९,७८७	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
२.	सन २००६ पूर्वी समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र.१ यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेले पद	०१	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
३.	गृह विभाग शासन निर्णय दिनांक टीटीसी-२६१६/प्र.क्र.३८/पोल-३,दिनांक २३.०३.२०१६ अन्वये पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण कार्यक्षेत्रामधील कामठी, जुनी कामठी व हिंगणा ही पोलीस ठाणी पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या कार्यक्षेत्रामध्ये समाविष्ठ करण्यात आल्यामुळे स्थानांतरीत झालेली पदे. (सन २००६ पुर्वीची ३६ पदे, गृ.वि.शा.नि.दि.१४.०६.२००७ मधील ३ पदे व गृ.वि.शा.नि.दि.०४.०३.२०१४ मधील ८० पदे)	११९	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
४.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३६०५/ प्र.क्र.३(अ)/पोल-३, दि.१७ फेब्रुवारी २००६	८,६८८	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
५.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३१०६/प्र.क्र.२२७/पोल-३, दि. २१ ऑगस्ट २००६	४४२	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
६.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३१०६/ प्र.क्र.२९५/पोल-३, दि. ११ ऑक्टोबर २००६	१३१	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
७.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३१०६/ १२१४/प्र.क्र.३११/पोल-३, दि.१४ जून २००७	९,७१८	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
८.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३१०८/ ६९७/प्र.क्र.२८४/पोल-३, दि. ७ ऑगस्ट २००८	९,६२३	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
९.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३१०९/ ८३६/प्र.क्र.३४०/पोल-३, दि. ३१ डिसेंबर २००९	७,६४६	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
१०.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३१०९/ २५१/प्र.क्र.८५/पोल-३, दि. ८ डिसेंबर २०१०	१,००७	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
११.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३११०/प्र.क्र.४२८/पोल-३, दि.१५ जून २०११ व २५ जुलै २०११	८,४३२	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
१२.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/पोल-३, दि. ४ मार्च २०१४	१०,२२३	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
१३.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-एपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/पोल-३, दि. ४ मार्च २०१४ (पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवर नवीन बेलतरोडी पोलीस ठाणे निर्माण करण्यास गृह विभाग शा.नि. क्र.एपीओ-३१११/प्र.क्र.१०७/पु.बां.२/ पोल-३, दिनांक ३०.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये स्थानांतरणाने उपलब्ध करुन देण्यात आलेली पदे)	११४	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
१४.	प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा/ नागपूर/ जालना/ बाभुळगांव लातुर/ मरोळ/ पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या कार्यालयाकरीता मंजूर असलेली व गृह विभाग शासन निर्णय	९ (पोल-५अ कार्यासनाशी संबंधीत पोलीस	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.

अ.क्र.	पदनिर्मिती केलेल्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक	एकूण पदांची निर्मिती	मागील मुदतवाढ दिलेल्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक
	क्र.अेपीओ-०२१५/ प्र.क्र.२६२/पोल-३, दिनांक ०७ जुलै, २०१७ अन्वये संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी यांच्या आस्थापनेवर स्थानांतरीत केलेली पोलीस निरीक्षकांची १० पदे. (गृ.वि.शा.नि.दि.२६.०४.१९९७ मधील १ पद, गृ.वि.शा.नि.दि.७.८.२००८ मधील ४ पदे, गृ.वि.शा.नि.दि. ३१.१२.२००९ मधील २ पदे, गृ.वि.शा.नि.दि. मधील ३ पदे)	निरीक्षकाचे १ पद वगळून)	
१५.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-अेपीओ-०३१४/ प्र.क्र.४७/पोल-३, दि. १३ ऑगस्ट, २०१४	१	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
१६.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-अेपीओ-०३१४/ प्र.क्र.५९/ पोल-३, दिनांक ०१ सप्टेंबर,२०१४	१५८	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
१७.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-अेपीओ-०३१४/प्र.क्र.०७/पोल-३, दिनांक ०१ सप्टेंबर, २०१४	१०६	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
१८.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-अेपीओ-०८१४/प्र.क्र.०८/पोल-३, दिनांक ०१ सप्टेंबर, २०१४. गृह विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक-अेपीओ-०८१४/प्र.क्र.०८/पोल-३, दिनांक ३० मे, २०१५	७०	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
१९.	गृह विभाग शासन निर्णय क्रमांक.अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(३ /पु.बां.२/भाग-१/पोल-३, दि.२० नोव्हेंबर, २०१४	१००	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
२०.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-अेपीओ-०३१४/ प्र.क्र.४७)/पोल-३, दि.२२ एप्रिल, २०१५	२५२	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
२१.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३५१४/प्र.क्र.१०/पोल-३, दिनांक २० मे, २०१५	१०५	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
२२.	गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३६१६ /प्र.क्र.१५८/पोल-३, दिनांक ०५ जानेवारी, २०१७. (विविध पोलीस अधीक्षक कार्यालयातील आर्थिक गुन्हे शाखेकरीता पोलीस उपअधीक्षक यांची वर्ग करण्यात आलेली पदे)	१६	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
२३.	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३६१६/प्र.क्र.८८/पोल-३, दिनांक ०९ जानेवारी, २०१७ (स्थापत्य उप अभियंता व स्थापत्य कनिष्ठ अभियंता यांची पदे)	५४ (पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर मंजूर असलेली स्थापत्य कनिष्ठ अभियंता यांची ०२ पदे वगळून)	गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीटीई-३६१७/ प्र.क्र.८६/पोल-३, दि.१३.१०.२०१७.
--	---	७६,८०२	---

२. आता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त विविध कार्यालयांसाठी उक्त तक्त्यात नमूद केलेल्या अ.क्र.०१ ते २३ येथील एकूण ७६,८०२ अस्थायी पदांना **दिनांक ०१ जानेवारी, २०१८ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८** पर्यंत खालील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त पदे वगळून उर्वरित पदांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच पदे ज्या कारणास्तव ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर केली आहेत, त्याचे पालन करण्यात यावे.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तिय सुधारणा-१, दिनांक १० सप्टेंबर २००१ आणि क्र.असंक-१००४/प्र.क्र.१२/२००४/वित्तिय सुधारणा-१, दिनांक १९ ऑगस्ट २००४ नुसार पदांच्या आढाव्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करुन कार्यालयाचा सुधारित आकृतीबंध उच्चस्तरीय सचिव समितीकडून अंतिमत: मान्य करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करण्यात यावा.

३) आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेताना शासनाच्या कार्यपद्धतीतील तंत्रज्ञानाचा वाढता वापर, काळानुरुप शासनाच्या मनुष्यबळात बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता या बाबींचा विचार करुन अनावश्यक पदे कमी करण्याचाही विचार करावा.

४) कोणत्याही परिस्थितीत दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत पदांचा आढावा उच्चस्तरीय समितीसमोर ठेवून मान्यता घेण्याबाबत वित्त विभागाने संदर्भाधिन क्र.३ येथील दिनांक ०८ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयानुसार सूचित केलेले आहे. आकृतीबंध निश्चित करावयाची कार्यवाही उशिरात उशिरा दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत पुर्ण करावयाची आहे. ही बाब विचारात घेता दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ अखेर पर्यंत पदांच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास, उपरोक्त अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतन व भत्याचा प्रश्न निर्माण झाल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालयाची राहिल.

५) उपरोक्त संदर्भाधिन क्र.१, २ व ३ येथे नमूद दिनांक ०१ सप्टेंबर, २०१४ शासन निर्णयांमधील अट क्र.१ ते ९ ह्या अनुक्रमे पुणे महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका व ठाणे महानगरपालिकेवर व संदर्भाधिन क्र.७ येथे नमूद दिनांक २० मे, २०१५ च्या शासन निर्णयांमधील अट क्र.१ ते ११ ह्या नवी मुंबई महानगरपालिकेवर बंधनकारक राहतील. सदर अटींचे पालन होत असल्याबाबत संबंधीत महानगरपालिकेचे आयुक्त व पोलीस प्रमुख यांनी संयुक्तपणे तपासुन सादर केलेला तपशील पुढील मुदतवाढीच्या प्रस्तावासोबत सादर करावा. सदर तपशिल सादर केल्याशिवाय सदरहू पदांना पुढील मुदतवाढ मिळणार नाही.

६) गृह विभागाच्या क्र.सीटीई-३११५/प्र.क्र.२/पोल-३, दिनांक २ जानेवारी २०१५ च्या पत्रातील माहितीसह यापुढील मुदतवाढीचा एकच प्रस्ताव सादर करण्यात यावा.

३. सदरचा खर्च खालील संबंधित लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

१) मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस (००)(०१) जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८)

२) मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००३ शिक्षण व प्रशिक्षण, (००)(०१) पोलीस प्रशिक्षण विद्यालये (२०५५००२३)

३) मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ संचालन व प्रशासन, (००)(०१) पोलीस निरीक्षणालय (२०५५००१४)

४) मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०१ गुन्हे अन्वेषण व दक्षता, (००)(०४)गुप्तवार्ता विभाग (२०५५०४३५)

५) मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १११ रेल्वे पोलीस (००)(०३) रेल्वे पोलीस (दत्तमत) (२०५५०४४४)

६) मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०१ गुन्हे अन्वेषण व दक्षता, (००)(०३) लाचलुचपत विरोधी केंद्र (२०५५ ००५२)

७) मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०१ गुन्हे अन्वेषण व दक्षता, (००)(०५) दहशतवाद विरोधी (२०५५०५७१)

८) मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, १०८ राज्य मुख्यालय पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस-आस्थापना (२०५५००९७)

९) मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, ११२ बंदर पोलीस, (००)(०१) नदी, बंदर व सागरी पोलीस (२०५५०२५७)

१०) मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ११८ विशेष सुरक्षा गट, (००) (०१) भारत राखीव बटालियन (२०५५०४७१)

४. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०८ जानेवारी, २०१८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२४१७२०१५७५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dhiraj K Abhang

Digitally signed by Dhiraj K Abhang
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b83edfcbaa0fddb5983e8303bccd9a96ef7cc55853b8b449ff8dc53d69f1618d, cn=Dhiraj K Abhang
Date: 2018.01.24 17:23:44 +05'30'

(धीरज कां. अभंग)

कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (सदर शासन निर्णयाची प्रत पोलीस महासंचालक यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत सर्व संबंधित कार्यालयांना उपलब्ध करुन द्यावी.)
२. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.
५. समादेशक, गृहरक्षक व नागरी संरक्षण दल, मुंबई.
६. महासंचालक व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
७. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
८. सर्व अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
१०. आयुक्त, पुणे महानगरपालिका/ मिरा-भाईंदर महानगरपालिका/ ठाणे महानगरपालिका / नवी मुंबई महानगरपालिका.
११. सर्व विशेष पोलीस महनिरीक्षक.
१२. पोलीस महानिरीक्षक (नक्षलग्रस्त विरोधी अभियान), नागपूर
१३. सर्व पोलीस उपमहानिरीक्षक.
१४. सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह).
१५. सर्व पोलीस प्रशिक्षण विद्यालये.

१६. सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१८.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२१. कक्ष अधिकारी (व्यय-७) / (वित्तीय सुधारणा-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. निवड नस्ती / पोल-३.